निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २१२ वा.
रविवार - ०५ ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## कुणबीचे चुकीचे दाखले दिल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई; मुख्यमंत्र्यांचे आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी**/ मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या निर्णयावरून ओबीसी समाजात निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यात आला असून, बनावट प्रमाणपत्रे देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल आणि त्यांनाच जबाबदार धरले जाईल, असे स्पष्ट आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती महसूलमंत्री व ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

तसेच, राज्यातील पूरस्थिती लक्षात घेता १० ऑक्टोबर रोजी होणारा मोर्चा मागे घेण्याची विनंतीही मुख्यमंत्र्यांनी ओबीसी शिष्टमंडळाला केल्याचे त्यांनी सांगितले. ओबीसी शिष्टमंडळासोबत सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, पर्यावरण आणि वातावरण बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास व बहुजन कल्याण दुग्धविकास मंत्री अतुल सावे, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार आणि ओबीसी संघटनांचे सुमारे ४० प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीनंतर महसूलमंत्री बावनकुळे यांनी माध्यमांना माहिती दिली.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले, मराठा-कुणबी प्रमाणपत्राच्या जीआरचा कुणीही गैरफायदा घेऊ नये व बनावट प्रमाणपत्रे दिली जाऊ नयेत, यावर सरकार आणि शिष्टमंडळ यांचे एकमत झाले आहे.

बैठकीत मंत्री छगन भुजबळ यांनी काही अधिकाऱ्यांनी खोटे दाखले दिल्याचे पुरावे सादर केले. यावर, 'जर एखाद्या अधिकाऱ्याने खोटे प्रमाणपत्र दिले, तर त्याला तो अधिकारीच जबाबदार असेल आणि त्याच्यावर



कडक कारवाई केली जाईल,' असे मुख्यमंत्र्यांनी निक्षून सांगितले आहे. या बैठकीत केवळ प्रमाणपत्रांवरच नव्हे, तर 'महाज्योती'ला निधी, ओबीसी वसतिगृहे, विद्यार्थ्यांना उद्योगासाठी सवलती आणि कमी व्याजदराचे कर्ज यांसारख्या ओबीसी समाजाच्या इतर मागण्यांवरही सकारात्मक चर्चा झाली. याविषयीच्या श्वेतपत्रिकेबाबत संपूर्ण माहिती आल्यावरच यावर बोलता येईल असे बावनकुळे यांनी सांगितले.

**ओबीसींचा मोर्चा मागे घेण्याचे आवाहन**

राज्यात अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती गंभीर आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी संघटनांनी १० ऑक्टोबर रोजी नियोजित केलेला मोर्चा परत घ्यावा, अशी विनंती आम्ही सर्वांनी शिष्टमंडळाला केली आहे. ओबीसी शिष्टमंडळ आमची विनंती मान्य करेल, असा आम्हाला विश्वास आहे, असे बावनकुळे म्हणाले.

**कुणाच्या ताटातलं दुसऱ्याच्या ताटात जाणार नाही'**

मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेवर बोलताना ते म्हणाले की, लोकशाहीत सर्वांना न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे, पण आरक्षणाचे निर्णय कायद्याच्या चौकटीतच होतील. सरकारची भूमिका मराठा आणि ओबीसी दोन्ही समाजांना न्याय देण्याची आहे.

कुणाच्या ताटातलं दुसऱ्याच्या ताटात जाणार नाही, हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे आणि कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही याची शासन पूर्ण काळजी घेईल, असेही त्यांनी नमूद केले.

## संक्षिप्त

### निकृष्ट दर्जाचे काम आणि निष्काळजी पणामुळे जीव गेला; जबाबदार कोण?

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/ प्रतिनिधी**/ पैठण शहरातील पन्नालालनगर ते लोंढे हॉस्पिटल दरम्यान नगरपरिषदेमार्फत सुरू असलेल्या अर्धवट ड्रेनेज लाईनच्या कामामुळे झालेल्या निष्काळजीपणामुळे नागरिकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असल्याबाबतची लेखी तक्रार उपविभागीय पोलीस अधिकारी पैठण यांना करण्यात आली असून याप्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपशहरप्रमुख पैठण तथा धाडस संघटना तालुकाध्यक्ष कल्याण गोविंदराव मगरे यांच्या वतीने जबाबदार अधिकारी व ठेकेदार यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.



तक्रारीनुसार, दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास किसन गणपतराव उदावंत हे छत्रपती शाहू महाराज चौक (राखा कॉर्नर) येथे अर्धवट खोदलेल्या व पावसाचे पाणी साचलेल्या ड्रेनेज खड्ड्यात पडले. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. सदर काम गेल्या चार महिन्यांपासून सुरू असून वारंवार थांबत असल्याने ते अद्याप अपूर्ण अवस्थेत आहे. अर्धवट कामामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून जीवितास धोका निर्माण झाल्याची तक्रार नागरिकांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपशहरप्रमुख तथा धाडस संघटना तालुकाध्यक्ष कल्याण गोविंदराव मगरे यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी पैठण यांना निवेदन देत नगरपरिषद मुख्याधिकारी, अभियंता तसेच माऊली कन्स्ट्रक्शन व खाजगी ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आंदोलन उभारले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. या घटनेनंतर शहरात संतापाची लाट उसळली असून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## देगलूर-बिलोलीतील ५ ग्रामपंचायतींना २० लाखांचा इमारत निधी मंजूर

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर/प्रतिनिधी**/आ. जितेश अंतापूरकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून, मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील पाच ग्रामपंचायतींना प्रत्येकी २० लाख रुपयांचा इमारत बांधकाम निधी मंजूर करण्यात आला आहे.या योजनेतून बिलोली तालुक्यातील कीनाळा, तळणी, चिरली/टाकळी तसेच देगलूर तालुक्यातील अंतापूर व शेळगाव या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. सदर निधी ग्रामपंचायत इमारतीच्या नव्या बांधकामासाठी वापरला जाणार आहे.आ. जितेश अंतापूरकर यांनी ग्रामीण भागातील प्रशासनात्मक सुविधा सक्षम व्हाव्यात, ग्रामस्थांना दर्जेदार व सुरक्षित सुविधा मिळाव्यात यासाठी सदर प्रस्ताव उच्चस्तरीय बैठकीत मांडला होता. त्यांच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले असून ग्रामपंचायत ईमारत बांधकाम निधिला मंजुरी मिळाले आहे.या निर्णयामुळे स्थानिक ग्रामपंचायतींना एक नवा चेहरा मिळणार असून, गावच्या प्रशासनाचा दर्जाही उंचावेल. ही कामगिरी स्थानिक विकासासाठी एक महत्त्वाचं पाऊल मानली जात आहे.दरम्यान, उपरोक्त गावांतील नागरिकांनी आमदार जितेश अंतापूरकर यांचे आभार मानत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील एकुण ५ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामास निधि मंजुर झाले असून शेळगाव ता.देगलूर येथील ग्रामपंचायत इमारत बांधकामास २५ लक्ष तर इतर चार ग्रामपंचायतीस प्रत्येकी २० लक्ष रु.निधि मंजूर झाले असून एकुन १ कोटी ५ लक्ष रु निधि देगलूर बिलोली मतदारसंघात आ.अंतापूरकर यांच्या प्रयत्नाने मंजुर झाले आहेत.

## नाशिकमधील नवीन रिंग रोडचे व साधूग्रामचे काम त्वरित पूर्ण करावे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी**/कुंभमेळा हे श्रद्धा, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचे प्रतीक आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठीची पायाभूत सुविधांची सर्व कामे दर्जेदार आणि गतीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. नाशिकमधील नवीन रिंग रोडचे काम पूर्ण करण्याबरोबरच साधू ग्राम/टेंटसिटीसाठीची भूसंपादनाची कामेही गतीने पूर्ण करण्यात यावीत असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ आढावा बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, पणनमंत्री जयकुमार रावल, नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, मुख्य सचिव राजेशकुमार, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, संबंधित विभागांचे सचिव उपस्थित होते. नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी सादरीकरणाव्दारे नियोजनाची माहिती दिली. जिल्हाधिकारी जलज शर्मा, आयुक्त मनीषा खत्री, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त करिश्मा नायर आदी यावेळी उपस्थित होते.

गर्दीचे नियोजन, कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठीच्या उपाययोजना करण्यात आल्याचे तसेच रस्त्यांची व मलनिःस्सारणाची कामे वेगाने पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यात येत असल्याचे गेडाम यांनी सांगितले.

**नदीपात्रातील पाणी स्वच्छ राहील यावर कटाक्षाने भर द्यावा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सिंहस्थ कुंभमेळा हा धार्मिक श्रद्धेचे प्रतीक आहे .संपूर्ण कुंभमेळा कालावधीत रामकुंडात आणि नेहमीसाठीच नदीपात्रातील पाणी स्वच्छ राहील हे कटाक्षाने पाहावे. मलनिःस्सारणाची कामे प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात यावीत. विमानतळे आणि रेल्वे सुविधांची कामेही गतीने पूर्ण करावीत. नाशिकमधील नवीन रिंग रोडचे काम त्वरित पूर्ण करावे. या कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक निधी त्वरित मंजूर करुन घ्यावा. इतर रस्त्यांची कामेही त्वरित हाती घेण्यात यावी. कामे अपूर्ण राहिल्याने नागरिकांची गैरसोय होता कामा नये याकडे लक्ष



द्यावे. विविध आखाड्यांशी चर्चा करून त्यांच्या गरजेनुसार साधूग्राममध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. सीसीटीव्ही कॅमेरे प्रणाली केंद्रीकृत पद्धतीने तयार करण्यात यावेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी 'एआय'च्या विविध पर्यायांचा वापर करण्यात यावा. 'मार्व्हल'चाही उपयोग करून घेण्यात यावा. पोलिसांच्या निवासासाठीची व्यवस्था प्राधान्याने करण्यात यावी. द्वारका सर्कल येथील कामे त्वरित पूर्ण करावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेद्वारे बस सेवेचे नियोजन करण्यात यावे. वाहनतळांच्या ठिकाणी भंडारा/लंगरची व्यवस्था करण्यात यावी असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

**प्रचार-प्रसिद्धीसाठी 'डिजिटल कुंभ' संकल्पना**

कुंभमेळ्याच्या प्रचार-प्रसिद्धीसाठी 'डिजिटल कुंभ' ही संकल्पना राबविण्यात यावी. प्रचार प्रसिद्धीसाठी स्वतंत्रपणे वेगळा आराखडा तयार करून नियोजन करण्यात यावे.

कुंभमेळा कामांसंदर्भात कोणत्याही प्रकारची नकारात्मक प्रसिद्धी होत असल्यास संबंधित विभागांनी यासंदर्भातील वस्तुनिष्ठ खुलासा त्वरित संबंधित माध्यमांना द्यावा. कुंभमेळ्यासाठीच्या आवश्यक कामांसाठी जिल्हास्तरावरील नोकरभरतीलाही गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

## अतिवृष्टीमुळे नुकसान झालेला मत्स्यव्यावसायिक मदतीपासून वंचित राहणार नाही- मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**
मराठवाड्यात मागील काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीसह मत्स्यव्यवसायालाही फटका बसला आहे. जलाशय, तलाव, मत्स्यपालन केंद्रे पाण्याखाली गेली असून बोटी, होडी, जाळी, मत्स्यबीज यासह उपकरणांचे आणि मत्स्यपालकांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाचे मंत्री नितेश राणे यांनी आज नुकसानीचा आढावा घेतला. प्रत्येक मत्स्यपालकांचे नुकसान व्यवस्थित नोंदविले गेले पाहिजे, शेतकऱ्याप्रमाणेच मत्स्यपालकांनाही शासनाची मदत मिळाली पाहिजे यासाठी नुकसानग्रस्त मत्स्यव्यावसायिकांचे तत्परतेने पंचनामे करून शासनाला अहवाल पाठवा असे निर्देशही त्यांनी दिले. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेला मत्स्यव्यावसायिक मदतीपासून वंचित राहणार नाही, शासन म्हणून आपण मत्स्यव्यावसायिकांच्या पाठीशी असल्याचे सांगुन त्यांनी उपस्थित मत्स्यव्यावसायिकांना धीर दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयात मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी आज छत्रपती संभाजीनगर व लातूर या दोन्ही विभागाच्या नुकसानीबाबत आढावा घेतला. यावेळी विभागाचे आयुक्त किशोर तावडे, मनपा आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सुरेश भारती, सहायक आयुक्त मधुरिमा जाधव आदींसह मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रमुख अधिकारी तसेच मत्स्यव्यावसायिक उपस्थित होते.मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री श्री.राणे म्हणाले, प्रत्येक मत्स्यपालकाचे अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान अचूक नोंदविले गेले पाहिजे, शेतकऱ्याप्रमाणेच मत्स्यपालकानांही शासनाची मदत मिळाली पाहिजे. पंचनामे अचूक करून त्याबाबतचा अहवाल तातडीने शासनाकडे पाठवा जेणेकरून त्याआधारे तातडीने मदत देता येईल. मत्स्यपालकांना या संकटातून उभे करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. त्या दृष्टीने प्रत्येकाने आपली जबाबदारी समजून काम करावे. जलसंपदा विभागाने गाळ काढण्याबाबतचा कार्यक्रम तयार करावा. याबाबत राज्यस्तरीय कार्यक्रमाची आखणी मंत्रालय पातळीवरून करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेला मत्स्यव्यावसायिक मदतीपासून वंचित राहणार नाही, शासन म्हणून आपण मत्स्यव्यावसायिकांच्या पाठीशी असल्याचे सांगून श्री.राणे म्हणाले, नुकसान भरपाईसोबत मत्स्यव्यावसयिकांना विविध सवलती देण्यासंदर्भात शासन सकारात्मक आहे. मत्स्यव्यवसाय विभागाने ज्या जिल्ह्यातील पंचनामे पूर्ण झाले त्याठिकाणचे मनुष्यबळ ज्याठिकाणी पंचनामे बाकी आहेत तिथे तातडीने उपलब्ध करून द्यावे. मत्स्यबीजाच्या दरामध्ये असलेल्या तफावती बाबत आपण लवकरच निर्णय घेणार असून जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेल्या तलावांचे पंचनामे वेळेत करण्याबाबतही ग्रामविकास मंत्री महोदयांशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त श्री.भारती यांनी माहिती दिली. श्री.भारती म्हणाले, छत्रपती संभाजीनगर विभागात ३८५ तलाव आहेत. यामध्ये ३३० तलावांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. अतिवृष्टीमुळे जाळी, बोटी, होडी, मत्स्यबीज, मत्स्यसाठा याचे नुकसान झाले आहे. तसेच विभागात असलेल्या पिंजरा मत्स्य संवर्धन प्रकल्पाचे देखील नुकसान झाले आहे. याबाबत नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम गतीने सुरू असून याबाबतचा सविस्तर अहवाल शासनाकडे पाठविला जाणार आहे.




लातूर विभागाचे प्रादेशिक उपायुक्त शिरिष गाथाडे यांनी लातूर विभागातील लातूर, धाराशिव, नांदेड व हिंगोली या चार जिल्ह्यांतील नुकसानीबाबत माहिती दिली. श्री.गाथाडे म्हणाले, लातूर विभागात एकूण ५१६ तलाव/जलाशय आहेत. अतिवृष्टीमुळे मत्स्यबीज, मत्स्यसाठी, होडी, जाळे यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पंचनामे गतीने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

लातुर विभागात चार जिल्हयांचा समावेश असुन लातुर, धाराशिव, नांदेड व हिंगोली या जिल्हयांचा समावेश होतो. लातुर जिल्हयात १५८ तलाव, धाराशिव २३६ तलाव नांदेड ९३ तलाव व हिंगोलीमध्ये ३० असे एकुण ५१६ तलाव / जलाशय आहेत. लातुर विभागात गोदावरी, मांजरा, रेणा, पुर्णा, तेरणा, सिना, तावरजा इ. प्रमुख नद्या आहेत. सद्यस्थितीत मराठवाडयात माहे २५ ऑगस्ट २०२५ ते माहे सप्टेंबर २०२५ अखेर कालावधीत अतिवृष्टी होऊन पुरपरिस्थिती निर्माण झाल्याने मच्छिमारांचे मत्स्यबीज, मत्स्यसाठा, होडी, जाळे इत्यादीचे नुकसान झालेले आहे.

लातुर जिल्हयात १० तालुके असुन ६० मंडळे, धाराशिव जिल्हयात ०८ तालुके व ५७ मंडळे, नांदेड जिल्हयात १६ तालुके व ७३ मंडळे तसेच हिंगोली जिल्हयात ०५ तालुके व मंडळे ३० असुन लातूर विभागात एकुण ३९ तालुके व २२० मंडळे आहेत. २२० पैकी १९२ मंडळात ६५ मिमी पेक्षा जास्त पर्जन्यमान झाल्याने पुरपरिस्थिती निर्माण झाली आहे.यावेळी मत्स्यव्यावसायिकांनी आपल्या झालेल्या नुकसानीबाबत माहिती दिली. यावेळी यावेळी मत्स्यव्यवसाय, जलसंपदा, व संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## पर्यटन; सामाजिक,सांस्कृतिक व आर्थिक विकासाचा आधारस्तंभ


जागतिक संतुलन टिकवीण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे.जगातील देशांना आर्थिकस्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे.पर्यटनाचे महत्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने १९८० पासुन २७ सप्टेंबर विश्र्व पर्यटन दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. कारण संयुक्त राष्ट्र संघाने २७ सप्टेंबर १९७० ला विश्व पर्यटन संघटनेचा संविधान स्वीकारला होता. जिवनामध्ये खुशी निर्माण व्हावी याकरिता पर्यटनस्थळांना भेट देने गरजेचे असते.पर्यटन फक्त जीवनात खुशीच निर्माण करत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावुन बळकट करण्याचे काम करीत असते.आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते.भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्र्व शांतीचा दुत आहे.पर्यटन हे जागतिक प्रदुषण नियंत्रणाचे सुध्दा महत्वाचे काम करीत असते.त्यामुळे पर्यटनावर जेवढा जास्त भर दील्या जाईल तेवढेच प्रदुषण कमी होईल व मानवजातीसह, जीवजंतू, वन्यप्राणी, जंगल संपदा यांना जीवदान व दिलासा मिळेल. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्व देण्याची गरज आहे.भारतात २८ राज्ये व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात. आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेतांना दिसतात. पर्यटस्थळे देशाला सुशोभित करतात व देशाच्या विकासाला हातभार लावण्याचे व चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून नेहमी होत असते.भारतात लाखोंच्या संख्येने विदेशी पर्यटक नेहमी येत असतात. कारण जगाच्या पाठीवर भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक, पुरातन,नामांकित व सुशोभित आहे.यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते. भारतातील पर्यटनामुळे विदेशी पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतातील पर्यटकसुध्दा अनेक रम्य ठिकानांणा भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवीतात.पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण देताना घोषणा केली की देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी १० पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा.भारतातील राजे-महाराजे यांचे साहित्य, किल्ले, काश्मिरसारखी पर्यटनस्थळे,देवी-देवतांची नामांकित स्थळे,ताजमहल, कुतुबमिनार,बुध्दगया सारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत. पर्यटनाला चालना मिळावी म्हणून अमेरिकन भारतीयांनी दरवर्षी पाच अभारतीय कुटुंबाना पर्यटक म्हणून भारतात पाठवावे असे आवाहन ह्युस्टनयेथील हाऊदी मोदीकार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी केले होते.कारण यामुळे पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल.जगात अनेक महत्वपूर्ण ठिकाणे आहेत.परंतु काही पर्यटन ठिकाणे निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे दुर्लक्षित होतांना दिसतात.ती वाचविण्यासाठी जगातील प्रत्येक देशांनी पुढाकार घेतला पाहिजे व पर्यटनाला चालना दिली पाहिजे. वाढते प्रदुषण,प्लास्टिकचे दुष्परिणाम, जगातील वाढते तापमान, भुकंप, सुनामी, महाप्रलय, ज्वालामुखीचा उद्रेक,वाढती लोकसंख्या यामुळे पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो व याचा दुष्परिणाम पर्यटकांवर होत असतो. याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे. याकरिता संपूर्ण जगाने विचार मंथन करण्याची गरज आहे. जगातील वाढत्या तापमानामुळे मोठमोठी ग्लेशीअर वितळत आहे.यामुळे पर्यटनावर,पर्यटकांवर आणि निसर्गावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.आज भारतातील व जगातील सर्वात मोठे पर्यटनस्थळ म्हणून गुजरात मधील नर्मदा नदीच्या काठावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा स्टॅच्यु ऑफ युनिटी भव्य पुतळा उभारण्यात आला आहे.या व्यतिरिक्त भारतात इतकी पर्यटनस्थळे आहेत की त्यांची तुलना करने कठीण आहे.भारतात गडकिल्ले, पुरातन भव्य मंदिरे, अजंठा वेरूळ सारख्या लेण्या, बौध्दगया, कुतुबमिनार,ताजमहाल इत्यादी अनेक ऐतिहासिक ठिकाणे पर्यटनाच्या बाबतीत प्रसीध्द आहे. आज जगाच्या दृष्टीकोणातुन विचार केला तर संपूर्ण भारतच पर्यटन स्थळाचा केंद्र बिंदू आहे.

# लाईटचा लोखंडी पोल अंगावर पडल्याने नाव्होलीच्या शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू!

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** गरीब असो की श्रीमंत आणि ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू हा अटळ आहे.हे निसर्गाने दिलेला नियम असुन तो सर्वांना पाळणे ही पाळणे आहे. फक्त मृत्यूची वेळ ठिकाण आणि कारण कोणाला माहीत नाही. काल देखील अशीच घटना नाव्होली गावात घडली असुन ठणठणीत प्रकृती असलेले आणि चालत बोलत या गावातील सर्वोपरीचीत शेतकरी बाबासाहेब बिक्कड (सावकार) यांच्या अंगावर लाईटचा लोखंडी पोल पडून त्यांचा उपचारा दरम्यान दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली असुन त्यांच्या निधनाने नाव्होली गावात आणि परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या बाबत सविस्तर माहिती अशी की केज तालुक्यातील नाव्होली येथील व्यवसायाने शेतकरी असणारे बाबासाहेब दादाराव बिक्कड वय अंदाजे ५५ वर्ष हे दि. २ ऑक्टोबर २०२५ गुरुवार रोजी दसरा सणा दिवशी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास गावातुन नांदूर केज रस्त्याने आपल्या घरी येत होते. त्याच दिवशी सकाळपासूनच गावापासून ते बाबासाहेब दादाराव बिक्कड हे राहातं असलेल्या येडझनी वस्ती पर्यंत महावितरण कंपनीचे राजेगाव सबस्टेशन अंतर्गत गावठाण शिंगलफेज लाईटचे लोखंडी पोल रोखण्याचे काम गुत्तेदारामार्फत सुरू होते. सायंकाळी अंदाजे ५:०० वाजणेच्या सुमारास बाबासाहेब बिक्कड हे गावाकडून येडझनी वस्ती असलेल्या आपल्या घराकडे येत होते. मात्र वाटेतच पोल रोवत असलेले पाहून रोडवर त्यांनी आपल्या शेतातुन काढून आणलेल्या सोयाबीनच्या ढिगाऱ्याजवळ काही वेळ ऊभे राहिले. असताना त्या ठिकाणी रोवण्यासाठी आणलेला लोखंडी पोल रोडच्या या बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे नेत असताना ट्रॅक्टरला लोखंडी साखळीने लटकलेल्या पोलची साखळी तुटली आणि वर लटकलेला लोखंडी पोल रस्त्याच्या कडेला आपल्या सोयाबीनच्या ढिगाऱ्याजवळ उभे असलेले बाबासाहेब दादाराव बिक्कड यांच्या डोक्यात पडला त्यात त्यांच्या डोक्याला पायाला गंभीर मार लागल्याने त्यांना अंबाजोगाई येथील स्वा.रा.ति.या ठिकाणी उपचारासाठी दाखल केले असता उपचार सुरू असताना त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हि घटना सायंकाळी घडल्याने आणि त्यादिवशी दसरा सण असल्याने शिमोलंघनाच्या तयारीत असणारे सारे गाव मृत्यूची माहिती मिळताच स्तब्ध झाले. त्यामुळे गावात शिमोलंघन झालेच नाही.



रात्रीची वेळ असल्याने त्यांचे शवविच्छेदन दुसऱ्या दिवशी सकाळी झाल्याने त्यांच्या पार्थिवावर दि.३ ऑक्टोबर शुक्रवार रोजी दुपारी १:०० वाजता त्यांच्या शेतात हाजारोच्या उपस्थित अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील सर्व ग्रामस्थ आप्तेष्ट, मित्रपरिवार, सामाजिक,राजकीय, धार्मिक क्षेत्रातील चाहते अंत्यविधी साठी उपस्थित होते. बाबासाहेब बिक्कड यांना सावकार या नावाने सर्वत्र ओळखले जात होते. त्यांचा चाहता वर्ग मोठा होता. तसेच त्यांना धार्मिक सांप्रदायिक कार्याची खुप आवड होती. या त्यांच्या जाण्याने नाव्होली गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी चंद्रकला, दोन मुले बालाजी आणि प्रदिप तर मुलगी सुरेखा (विवाहित) जावाई,सुना, नातवंडे असा मोठा परिवार असुन त्यांचा रक्षा सावरण्याचा कार्यक्रम दि.४ ऑक्टोबर शणिवार रोजी सकाळी ७:३० वाजता ठेवण्यात आला आहे.

**घटनेच्या अगोदर काय घडले**

नाव्होली येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक बिक्कड आणि दैनिक लोकनायकचे केज तालुका प्रतिनिधी पत्रकार महादेव काळे हे दोघे मित्र दि. २ ऑक्टोबर गुरुवार रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास केजहुन आपल्या गावी नाव्होली या ठिकाणी आपापल्या दुचाकीवरुन येत असताना गावाजवळील खंडोबा मंदिराजवळ असणाऱ्या पोपट बिक्कड यांच्या घरासमोर सुभाष बिक्कड यांची म्हैस अचानक आडवी पळल्याने दोघांच्या गाड्यांना जोराची धडक बसल्याने या गाड्या खाली पडल्या याच वेळी बाबासाहेब बिक्कड गावाकडून घरी जात होते. त्या ठिकाणी थांबून विचारपूस करुन दहा मिनिटे बोलुन आपल्या घराकडे गेले मात्र वाटेतच पोल रवण्याच्या कामाजवळ थांबल्याने त्यांच्यावर हा मृत्यू ओढवला. अपघातानंतर अवघ्या अर्ध्या तासात ही घटना घडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

# जागतिक शिक्षक दिन : बुद्धकालीन गुरु व आधुनिक शिक्षक

मानव इतिहासातील प्रत्येक युगात शिक्षक हा समाजाचा केंद्रबिंदू राहिला आहे. ज्ञान, संस्कार, मूल्ये, नैतिकता आणि जीवनाला दिशा देणारा दीपस्तंभ म्हणजे शिक्षक. म्हणूनच ५ ऑक्टोबर हा दिवस जगभर 'जागतिक शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. युनेस्कोने १९९४ साली या दिवसाची सुरुवात केली आणि तेव्हापासून संपूर्ण जगात शिक्षकांच्या योगदानाचा गौरव होत आहे. पण शिक्षक संकल्पना समजून घेण्यासाठी आपण केवळ आधुनिक काळात न थांबता प्राचीन काळात, विशेषतः बुद्धकालीन परंपरेत डोकावले पाहिजे. कारण त्या काळातील शिक्षण व शिक्षकाची भूमिका आजच्या काळातील शिक्षकांना प्रेरणा देणारी ठरते. बुद्धकालीन संदर्भ आणि आधुनिक संदर्भ या दोन परंपरांचा संगम म्हणजेच खऱ्या अर्थाने शिक्षक दिनाचा सखोल अर्थ होय. बुद्धकाल हा भारतीय समाजजीवनातील बौद्धिक आणि सामाजिक परिवर्तनाचा कालखंड मानला जातो. त्या काळातील शिक्षक म्हणजे गुरु हे शिष्यांना फक्त ग्रंथपठण शिकवणारे नव्हते, तर ते जीवनमूल्यांचे शिल्पकार होते. गुरुकुल प्रणालीमध्ये शिष्य आपले संपूर्ण जीवन गुरुंच्या मार्गदर्शनाखाली व्यतीत करीत असत. ज्ञानासोबत संयम, सत्य, प्रामाणिकपणा, करुणा आणि समता यांचे शिक्षण दिले जाई. बुद्धकालीन शिक्षकांचा केंद्रबिंदू म्हणजे समाजहित. ते फक्त वैयक्तिक यशावर भर देत नसून शिष्यांच्या माध्यमातून संपूर्ण समाजाची प्रगती साधण्याचा प्रयत्न करीत.

गौतम बुद्ध स्वतः सर्वोत्तम शिक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांनी ज्ञानसंपादनाची नवी दृष्टी दिली. अप्प दीपो भव म्हणजे स्वतःचा प्रकाश स्वतः व्हा, हा त्यांचा उपदेश शिष्यांना आत्मनिर्भरतेचे धडे देणारा होता. त्यांनी कधीही अंधानुकरणाची शिकवण दिली नाही; उलट विवेकबुद्धी, तपासणी, शंका आणि संवाद यांवर आधारित शिक्षणपद्धती त्यांनी रुजवली. शिष्यांना त्यांनी सांगितले की तुम्ही माझ्या शब्दांवर आंधळा विश्वास ठेवू नका, विचार करा, अनुभव घ्या आणि मग स्वीकारा. हीच खरी गौतम बुद्धांची वैज्ञानिक वृत्ती होती. या विचारसरणीमुळे शिक्षकाची भूमिका म्हणजे तर्कबुद्धी जागवणारा आणि विवेक विकसित करणारा असा होती. बुद्धकालीन विहार आणि विद्यापीठे ही शिक्षक-शिष्य संबंधांची केंद्रे होती. नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला यांसारख्या विद्यापीठांत शिक्षक केवळ विद्वान नव्हते तर समाजदूत होते. शिष्यांना ग्रंथपठणाबरोबर समाजसुधारक मूल्यांचे धडे दिले जात. पंचशील, अष्टांगिक मार्ग, करुणा आणि अहिंसा या बौद्ध मूल्यांवर आधारित शिक्षण हीच त्या काळातील शिक्षकांची खरी देणगी होती. शिक्षण हे फक्त ज्ञानसंपादनासाठी नसून समाजातील विषमता दूर करण्यासाठी आणि मानवी जीवन अधिक सुंदर करण्यासाठी आहे, हेच तत्त्व ते शिकवीत.

आजच्या आधुनिक काळात शिक्षकांची भूमिका बदलली असली तरी तिचे सार तेच आहे. आज माहितीच्या युगात प्रत्येकाकडे ज्ञानसाधने सहज उपलब्ध आहेत. इंटरनेट, स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाइन शिक्षण इत्यादी. या सर्वांमुळे शिक्षकाचे काम केवळ माहिती पुरविण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. शिक्षकाला आता माहितीचे ज्ञानात, आणि ज्ञानाचे शहाणपणात रूपांतर करून विद्यार्थ्यांना योग्य दिशा द्यावी लागते. डिजिटल युगात शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम शिकवणारा नसून मार्गदर्शक, समुपदेशक, प्रेरणादाता आणि मूल्यसंस्कारक बनला पाहिजे. आधुनिक काळातील शिक्षकांची जबाबदारी बुद्धकालीन गुरूंहून अधिक व्यापक आहे. कारण आजची मुले केवळ परीक्षेतील गुणांसाठी शिकत नाहीत, तर त्यांना जागतिक स्पर्धेत टिकून राहायचे आहे. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांत सर्जनशीलता, नवोन्मेष, तर्कशक्ती, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि मानवी मूल्ये रुजवावी लागतात. जसे बुद्धकालीन शिक्षकांनी शिष्यांना प्रश्न विचारायला, संवाद साधायला आणि सत्य शोधायला प्रवृत्त केले, तसेच आजचे शिक्षक विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करायला आणि समस्या सोडवायला शिकवतात.

बुद्धकालीन संदर्भ आणि आधुनिक संदर्भ यांची तुलना केली तर अनेक साम्यस्थळे दिसून येतात. बुद्धकालीन शिक्षकांनी समाजातील अंधश्रद्धा, अन्याय आणि विषमता दूर करण्यासाठी शिक्षणाचा वापर केला. आजचे शिक्षकही समाजातील पर्यावरण समस्या, हिंसा, डिजिटल व्यसन, सामाजिक माध्यमांचा गैरवापर, लिंगभेद, असमानता यांसारख्या प्रश्नांवर विद्यार्थ्यांना संवेदनशील करतात. त्या काळात शिक्षकांनी शिष्यांना करुणा आणि समतेचे धडे दिले, तर आज शिक्षक विद्यार्थ्यांना मानवाधिकार, लोकशाही मूल्ये आणि शाश्वत विकास यांची जाण देतात. तथापि, आधुनिक शिक्षक अनेक आव्हानांशी सामना करीत आहेत. ग्रामीण भागातील शाळांची अपुरी साधनसामग्री, करारावर काम करणाऱ्या शिक्षकांची असुरक्षितता, प्रशासकीय कामाचा ताण, डिजिटल साधनांच्या अभावामुळे शिकवण्यातील अडचणी यामुळे शिक्षकांचे कार्य जड झाले आहे. तरीही जे शिक्षक आपले काम ध्येय मानतात, तेच खऱ्या अर्थाने बुद्धकालीन गुरुंच्या वारशाला न्याय देतात. जागतिक शिक्षक दिनाचा खरा अर्थ म्हणजे शिक्षकांच्या योगदानाची दखल घेणे आणि त्यांच्या कार्याला योग्य सन्मान देणे. बुद्धकालीन संदर्भ सांगतो की शिक्षक हा केवळ माहिती देणारा नसून मूल्यांचा वाहक आहे. आधुनिक संदर्भ सांगतो की शिक्षकाला नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत विद्यार्थ्यांना सुसंस्कारित नागरिक घडवावे लागते. म्हणूनच आज आपल्याला या दोन्ही परंपरांचा संगम साधावा लागेल.

५ ऑक्टोबर रोजी असणार्या जागतिक शिक्षक दिनानिमित्त आपण ठरवायला हवे की आपल्या शिक्षणव्यवस्थेत बुद्धकालीन मूल्यांचा व आधुनिक तंत्रज्ञानाचा मेळ घालावा. शिक्षकांना योग्य प्रशिक्षण, संसाधने, मानवी सन्मान आणि प्रेरणा द्यावी. कारण राष्ट्राचे भविष्य शिक्षकांच्या हातात आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा वैज्ञानिक, नेता, समाजसुधारक, विचारवंत होणार आहे. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ वर्गखोल्यापुरती मर्यादित नसून समाजपरिवर्तनाची आहे. म्हणूनच आपण या दिवशी केवळ औपचारिक कार्यक्रमापुरते न थांबता शिक्षकांना खरे समर्थन द्यावे, त्यांच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहावे आणि शिक्षण अधिक न्याय्य, मूल्याधिष्ठित आणि समाजाभिमुख करण्यासाठी प्रयत्न करावे. बुद्धकालीन गुरूंनी दिलेली प्रेरणा आणि आधुनिक शिक्षकांचे ध्येय हे दोन्ही एकत्र केल्यासच मानवतेचे खरे कल्याण साध्य होईल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स

आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ऍपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ऍपल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन.

स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल - क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला. सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलमजुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती. हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता. दोंघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले. कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ऍपल. पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली. त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ऍपल १ पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्ह ने अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ऍपल कंपनी सोडली. १९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते. या कंपनीने ऍनिमेशन सिनेमे बनवले. ते खूप गाजले. या कंपनीने वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ऍपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ऍपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ऍपलमध्ये परतले. आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ऍपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ऍपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला. हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत. हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ऍपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला. टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ऍपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले. सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते. ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते. नवनिर्मितीचा ध्यास, तंत्रज्ञानाची आवड, मार्केटिंगमधील कौशल्य, सतत शिखरावर राहण्याची जिद्द या गुणांमुळे स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला. त्याचा प्रतिस्पर्धी मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# शेख असलम यांना राज्यस्तरीय 'प्रेरणादीप आदर्श पत्रकारिता पुरस्कार-२०२५ प्रदान

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर/ प्रतिनिधी/** पत्रकारिता आणि समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत जनतेच्या समस्यांना आवाज देणारे देगलूरचे कृतिशील पत्रकार शेख असलम यांना प्रतिष्ठेचा 'प्रेरणादीप उत्कृष्ट राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार-२०२५' प्रदान करण्यात आला आहे. मातोश्री लक्ष्मीबाई ठाकूर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, आणि मायडी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समारंभात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मारुती शिकारे यांच्या हस्ते त्यांना यशाची सत्कार करून सन्मानचिन्ह आणि गौरवपत्र देण्यात आले. या सन्मानानंतर त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, देगलूरसह जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

गोरगरीब परिस्थितीतून आलेले आणि जिद्दीच्या बळावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारे शेख असलम हे निर्भीड, प्रामाणिक आणि लोकाभिमुख पत्रकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी दैनिक साहित्य सम्राट, कुलस्वामिनी संदेश, दैनिक भास्कर आणि तरुण भारत या नामांकित वृत्तपत्रांत उल्लेखनीय पत्रकारिता केली असून सध्या ते दैनिक 'एकमत' मध्ये कार्यरत आहेत. त्याचबरोबर लोकवाणी वार्ता या यूट्यूब चॅनलचे प्रमुख म्हणून ते स्थानिक तसेच सामाजिक विषयांवर सक्रीय पद्धतीने काम करत आहेत. त्यांची लेखणी सदैव समाजातील दुर्बळ, उपेक्षित आणि वंचित घटकांच्या न्यायासाठी झटणारी ठरली आहे.

पत्रकारितेबरोबरच शेख असलम हे समाजसेवेच्या क्षेत्रातही तितकेच सक्रिय आहेत. पत्रकार संरक्षण समिती (महाराष्ट्र) चे देगलूर तालुकाध्यक्ष म्हणून त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांवर काम करताना महत्वपूर्ण योगदान दिले आहे. याच बरोबर सामाजिक संघटनेच्या माध्यमातून त्यांनी अनेक रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण मोहिमा, अन्नदान, रुग्णालय मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, कोरोना काळातील सेवाकार्य आणि पत्रकार व पोलिसांचा सन्मान कार्यक्रमांचे आयोजन करून समाजातील एकोपा आणि सेवाभाव जपला आहे. त्यांच्या या सामाजिक



आणि पत्रकारितेतील कार्याबद्दल पुरस्कार निवड समितीने गौरवोद्गार काढताना म्हटले आहे की, आपण आपल्या कार्यक्षेत्रातील जबाबदारी निष्ठेने आणि सेवाभावाने पार पाडत आहात. आपल्या लेखणीतून समाजातील संवेदनशील विषयांना न्याय मिळतो आणि सामाजिक एकोपा दृढ होतो.

हा सन्मान म्हणजे शेख असलम यांच्या जिद्दी, परिश्रम आणि निष्ठेचा गौरव असून देगलूरच्या पत्रकारितेचा अभिमान वाढवणारा ठरला आहे. त्यांच्या कार्याबद्दल समाजातील विविध मान्यवर, सहकारी पत्रकार आणि नागरिकांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. आपली लेखणी म्हणजे समाजासाठी प्रेरणेचा दीप आहे, अशा शब्दांत त्यांचा गौरव करण्यात आला आहे..

# सरकारी नोकरी म्हणजे जनतेच्या सेवेची संधी- पालकमंत्री संजय शिरसाट

**जिल्ह्यातील ३०३ जणांना समारंभपूर्वक नियुक्तीपत्र प्रदान**

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** अनुकंपा तत्वारील गट क व गट ड तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे सरळसेवा भरतीद्वारे निवड झालेल्या जिल्ह्यातील ३०३ उमेदवारांना आज समारंभपूर्वक राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिर-साट यांच्या हस्ते आज नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.राज्यभरात आज एकाच दिवशी १० हजार ३०९ उमेदवारांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. मुंबई येथे मुख्यसमारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आली. हा सोहळा या कार्यक्रमात दुरदृष्यप्रणालीने दाखवण्यात आला.

आपल्याला मिळालेली सरकारी नोकरी ही जनतेच्या सेवेची संधी आहे, अशा शब्दात पालकमंत्री शिरसाट यांनी नवनियुक्त उमेदवारांना संबोधित केले. जिल्ह्यातील मुख्य कार्यक्रम आज संत एकनाथ रंगमंदिर येथे पार पडला. राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, आ. अनुर-ाधा चव्हाण, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र,पोलीस आयुक्त प्रवीण पवार,पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे तसेच अन्य प्रशासकीय विभागप्रमुख उपस्थित होते.

नवनियुक्त उमेदवारांशी संवाद साधतांना पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, शासनाने अवलंबिलेल्या नव्या कार्यपद्धती व नियमांमध्ये सुधारणा केल्याने आज अनेकांच्या अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीचा प्रश्न निकाली निघाला आहे. त्यासाठी शासनाने अनेक वर्ष प्रलंबित असलेली अनेक प्रकरणे निकाली काढली. इतक्या उमेदवारांना नियुक्तीपत्र माझ्या हस्ते प्रदान केले जात आहेत, हा माझ्या आयुष्यातील मोठा क्षण आहे. प्रत्येक नोकरीधारकावर आपल्या कुटुंबाची जबाबदारी आहे. अनुकंपा तत्त्वावर ज्यांना नियुक्ती मिळाली आहे, त्यांनी आपले कुटुंब, आपल्यावर अवलंबून असणारे यांची काळजी घ्यावी. नोकरी प्राप्त केल्यानंतर



परिश्रम आणि अभ्यास करुन आपल्या पदाचा आलेख उंचावत ठेवा. शासकीय नोकरी ही जनतेची सेवा करण्याची संधी आहे. आपल्याकडे आलेल्या माणसांचे काम करुन द्यावे त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ही सगळ्यात मोठा असतो.आ. अनुराधा चव्हाण ह्यांनीही नवनियुक्त उमेदवारांचे शासकीय सेवेत स्वागत केले. आपली नोकरी करुन जनतेच्या सेवेचे समाधान प्राप्त करावे,असे आ-वाहनही त्यांनी केले.प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी केले. सुत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले.

# पुरग्रस्त मदत यादीत कुरणपिंपरी ग्रामपंचायतने केला भ्रष्टाचार

**गावकऱ्यांना सरपंच पुत्राची धमकी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण / प्रतिनिधी/** पैठण तालुक्यातील कुरणपिंपरी गावाच्या पुरग्रस्त तात्काळ मदत यादीत कुरणपिंपरी ग्रामपंचायतने केला मनमानी कारभार.गावातील पुरग्रस्त नागरिकांना, अपघातग्रस्तांना डावळुन बाहेरगावी वास्तव्यस असलेल्या नागरीकाचा केला समावेश गावकऱ्यांनी यादी-वर आक्षेप घेताच शासकीय राषण(स्वस्त धान्य) यादीचा व धान्यचा कुठलाही अधिकार नसतांना यांच्या हुकुमशाहीला चाप बसणार म्हणून सरपंच यांनी सरपंच सावत्र पुत्र शेख गुलाब कठ्ठू यांना व इतर नातेवाईकांना गावकऱ्यांना गुंडगिरी करून धमकावण्यास सांगितले व बेजबाबदारपणे एक शिक्षक असलेल्या सावत्र पुत्राने स्वातहा व इतर आपले नातेवाईक यांच्या मदतीने गावकऱ्यांना दांडे, लोखंडी रॉड, व इतर वस्तूंचे साह्याने धमकावले व अनेकांना आश्शील शिवीगाळ केली.व सदर कृत्येची माहीती गावकरींनी पत्रकार पठाण यांना दिली असता पठाण हे वृत्तसंकलन करत असतांना झालेल्या भ्रष्टाचाराची माहीती नागरीककांच्या प्रतिक्रीया घेत असतांना त्यांना सरपंच यांनी केलेले भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून सरपंच यांच्या सांगण्यावरून त्यांचा सावत्र पुत्र शेख गुलाब कठ्ठू यांनी त्यांना आश्शिल भाषेत शिवीगाळ करून धक्काबुकी केली व आपला भाऊ व इतर नातेवाईकांना फोन करून बोल-ावून मोठा बेकायदेशीर जमाव जमऊन हातात काठ्या लोखंडी गज व इतर घातक वास्तुच्या साह्याने हल्ला केला.

परंतु इतर गावकरींनी मध्यस्थी करून त्यांना बाजुला घेतले त्यामुळे ते वाचले.सदर घटना ही गावातील अनेक कॅमेरेत कैद झाली आहे.

पत्रकार कलीम पठाण यांच्या तक्रारीवरू पैठण पोलिस ठाणे येथे १) शेख गुलाब कठ्ठू.२) शेख नदीम कठ्ठु ३) शेख रज्जाक चांद.४) शेख गणी चांद.५) शेख राजु चांद.६) शेख मजीद शाम्मद .७) शेख मुजीब शाम्मद.८) शेख अजीम शाम्मद.९) शेख आस्रफ महम्मद १०) शेख अजीम शाम्मद. ११) शेख आन्सर अब्दुल.व इतर या आरोपी विरूद्ध बेकायदेशीर जमाव जमाकरणे, गाव-ाची शांतता भंग करणे,घातक वास्तुच्या वापर करून हल्ला करणे,दंगा घडवण्यासारखी स्ती-थी निर्माण करणे.प्रसारमाध्यमांना विरोध करून साहित्यचे तोडफोड करणे नुकसान करणे.व इतर गंभीर आरोपाखाली भारतीय दंड संहिता बी.एन.एस.२०२३. खाली ११५,३५२,३५१(३), ३२४(२),१८९(२),१८९(४),१९०,१९१(२),१९१(३), व महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था (हिंसा आणि मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक) अधिनियम -२०१७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आले.पुढील तपास कर्तव्यदक्ष उप विभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील हे करत आहे.

## मच्छिमार बांधवांच्या नुकसानीचे पंचनामे करुन मदतीचा प्रस्ताव सादर करा- मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे

छत्रपती संभाजीनगर, दि.३ (जिमाका)- अतिवृष्टीमुळे मच्छिमार बांधवांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन मत्स्य व्यावसायिकांना मदत देण्याचा प्रस्ताव तयार करा, असे निर्देश राज्याचे मत्स्य व्यवसाय व बंदरे विभागाचे मंत्री नितेश राणे यांनी आज दिले.

फुलंब्री मतदार संघाच्या आमदार अनुराधा चव्हाण, मस्य व्यवसाय विभागाचे आयुक्त किशोर तावडे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सुरेश भारती, तहसीलदार योगिता खटावकर, सहाय्यक आयुक्त मधुरिमा जाधव,जलसंधारण विभागाचे उप अभियंता वनगुजरे, मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष सुषमेश प्रधान आदी यावेळी उपस्थित होते.

फुलंब्री शहर लहान्याची वाडी या सांडव्याच्या ठिकाणी मत्स्यव्यवसायिक मासेमारी व्यवसाय करत असतात. अतिवृष्टीमुळे अतिरिक्त वाहून आलेल्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात मासेमारी करणाऱ्यांचे जाळ्यांचे नुकसान झाले. तसेच मत्स्यबीज पुराच्या पाण्यात वाहून गेले. तसेच वाढ होत असलेले मासेही वाहून गेल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यानुकसानीची पाहणी करण्यासाठी आज मंत्री राणे हे जिल्ह्यात आले होते. त्यांनी लाहन्याची वाडी ता. फुलंब्री सांडवा येथे प्रत्यक्ष पाहणी करून मच्छिमार बांधवांशी चर्चा केली. याठिकाणी मत्स्य व्यवसाय विभागामार्फत नुकसानीचे पंचनामे झाले आहेत. त्या पंचनाम्यांच्या आधारे मच्छिमारांबा मदत देण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश श्री. राणे यांनी दिले. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या मच्छिमार बांधवांना शासनामार्फत योग्य ती मदत देण्यात येईल,असे आश्वस्त करुन त्यांनी नुकसानग्रस्तांना दिलासा दिला..

## पिशोर पोलीस स्टेशनचे कर्मचारी विलास सोनवणे यांचा विशेष गौरव पुरस्कार



**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी/** कन्नड छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) पो-लीस अधीक्षक कार्यालयातर्फे पोलीस शिपाई विलास संतोष सोनवणे (पो.स्टे. पिशोर) यांना त्यांच्या उल्लेखनीय व प्रशंसनीय कार्याबद्दल प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले.गु. र. ४५/२०२१, कलम ३०२ भा. दं. सं. अंतर्गत तपासात विलास सोनवणे यांनी केलेल्या उत्तम तपासकामामुळे गुन्ह्याचा यशस्वी उलगडा झाला. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना प्रशस्तिपत्रासह रोख रु. १५००/- बक्षीस प्रदान करून गौरविण्यात आले आहे.या कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक डॉ. विनायकुमार राठोड यांनी सोनवणे यांचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, गुन्ह्यांच्या तपासात कसोटी, धाडस आणि वेगव-ान कामगिरी ही पोलीस दलाची खरी ताकद आहे. अशा कार्यामुळे समाजात कायद्यावरील विश्वास अधिक दृढ होतो.सोनवणे यांच्या यशस्वी तपासामुळे पोलीस दलात उत्साहाचे वातावरण असून, सहकाऱ्यांनीही त्यांचे कौतुक केले आहे.

# बंजारा समाजाचा खुलताबाद शहरात एल्गार; एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मोर्चाद्वारे मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/ प्रतिनिधी /** खुलताबाद तालुक्यातील बंजारा समाजाचे तांडे मुख्य वस्ती पासुन वेगळे वसलेले असले तरी हे लोक संस्कृती, एकात्मतेचे दर्शन देतात मात्र देश स्वतंत्र होवुन ७८ वर्षे झाले तरी बंजारा समाज अनुसूचित जमाती या आरक्षणा पासुन वंचित आहे,आता आरक्षण घेतल्याशिवाय समाज थांबणार नसल्याचे प्रतिपादन माजी खा-सदार हरिभाऊ राठोड यांनी शुक्रवारी (ता.तीन) खुलताबादेत केले. खुलताबाद तालुक्यातील गौर बंजारा समाजातर्फे शुक्रवारी (ता. तीन) आरक्षण मागणीसाठी मोर्चा काढण्यात आला होता, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरातून या मोर्चेला बारा वाजेच्या सुमारास सुरुवात झाली,तहसील कार्यालयाबाहेर या मोर्चाचे सभेत रूपांतर



झाले.यावेळी माजी खासद-ार हरिभाऊ राठोड यांच्यासह समाजातील विविध प्रतिनिधींनी आरक्षणा बाबत आपली भूमिका समाजासमोर मांडली.

यानंतर समाजातर्फे विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार स्वरुप कंकाळ यांना देण्यात आले.

हैदराबाद गाझीट नुसार राज्यातील गोर बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) प्रवर्गात समाविष्ट करून आरक्षण द्यावे, या प्रमुख मागणीसाठी खुलताबाद तालुक्यातील सकल गोर बंजारा समाजातर्फे शुक्रवारी (दि.३) एल्गार मोर्चा काढण्यात आला.या मोर्चात हजारोंच्या संख्येने गोर बंजारा समाज बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.महिलांची संख्या लक्षणीय होती. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तरुणांनी हातात संत सेवालाल महाराजांचा पांढरा ध्वज घेऊन हलकीच्या तालावर नृत्य करून मोर्चाला उत्साहपूर्ण सुरुवात झाली होती.यावेळी कोणत्याही अनुचित प्रकार घडू नाही म्हणून दक्षता घेत खुलताबाद पोलीस प्रशासनातर्फे योग्य ती खबरदारी घेत पोलीस निरीक्षक धनंजय फराटे चांच्या मार्गदर्शनाखाली तगडा बंदोबस्त लावण्यात आले होते.

# जिल्हा परीषद केंद्रीय शाळा सोयगाव येथे आनंददायी शनिवार उपक्रमातर्गत आगळावेगळा भुलाबाई उत्सव संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / प्रतिनिधी/** जिल्हा परी-षद केंद्रीय शाळा सोयगाव येथे आनंददायी शनिवार उपक्रमातर्गत भुलाबाई उत्सव मान्यवरांच्या उपस्थित साजरा करण्यात आला.भाद्रपद महीन्या मध्ये लहान मुली आपल्या घरोघरी भुलाई बसवत असतात व दररोज सकाळ संध्याकाळ एकत्र येऊन भुलाबाई समोर आरती,गाणी म्हणत अस-तात.शाळेमध्ये शनिवार हा आनंददायी व दप्तर मुक्त असतो यामध्ये विद्यार्थ्यासाठी वेगवेगळे नाविन्यपुर्ण उपक्रम राबविले जातात.याच उपक्रम अंतर्गत भुलाबाई उत्सवाचे आयोजन केंद्र शाळेत करण्यात आले होते.

भुलाबाई उत्सवाची सुरुव-ात सोयगाव शहराच्या नगराध्यक्षा आशाबी तडवी,उपाध्यक्षा सुरेखा प्रभाकर काळे,नगरसेविका संध्या मापारी,महीला व बालकल्याण सभापती कुसुम राजू दुतोंडे याच्या शुभहस्ते भुलाई पुजन करून करण्यात आले यावेळी शाळेतील वर्ग १ ली ते वर्ग ७ वी पर्यतच्या विद्यार्थीनीनी भुलाबाईची वेगवेगळी गाणी ताला सुरात म्हणून



त्यावर टिपरी खेळण्याचा आनंद घेतला.या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे मान्यवरांनी कौतुक करून शाळेच्या विकासासाठी नेहमी कटीबध्द व सहकार्य असल्याचे सांगितले.यावेळी नगरसेवक बंटी काळे,केंद्र प्रमुख फिरोज तडवी,समाजसेवक राजुभाऊ दूतोडे,विजय काळे शालेय व्यवस्थापन समिती अण्णा वाघ,रंगनाथ लोखंडे, रविंद्र साखळे यांची प्रमुख उपस्थिती होती तर उपक्रम यशस्वीते साठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षिका सुरेखा चौधरी,रामचंद्र महाकाळ,मंगला बोरसे,गणेश बाविस्कर,प्रतिभा कोळी,अंकुश काळे,बिलाल बागवान,शेख निखार,अनिल देसाई,तानाजी चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

## रविवारी जालन्यात चर्मकार समाजातील दह-ावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** शहरातील कचेरी रोडवरील मुक्तेश्वरद्वारजवळील पाठक लॉन्सवर रविवारी (५ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता जालना जिल्हा चर्मकार समाजातर्फे इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थी, शासकीय-निमशासकीय सेवेत रुजू, सेवानिवृत्त व जेष्ठांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. आ. अर्जुनराव खोतकर व आ. नारायण कुचे यांच्या हस्ते हा सन्मान केला जाणार आहे. यावेळी जालना शहर मनपा आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर, कल्याण डोंबीवली मनपाच्या उपायुक्त वंदनाताई गुळवे, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, प्रा. डॉ. युवराज गहेराव, शिक्षक तथा साहित्यिक रोहिदास शिखरे व शिक्रापुर (पुणे) चे उद्योजक रामदास बिरभाऊ यांची प्रमुख उपस्थिती राहील. यावेळी बुलढाणा येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक रमेश विठोरे व बदनापूरच्या रावसाहेब पाटील दानवे कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. ललीता भगुरे-आक्षेय उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

सर्व समाजबांधवांनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जालना जिल्हा चर्मकार समाज गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा समिती -२०२५ तर्फे करण्यात आले आहे.

# संक्षिप्त

## डाक अदालत दि.१३ रोजी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** टपाल विभागातील सेवांबद्दल असलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासंदर्भात सोमवार दि.१३ रोजी डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर डाक विभागाच्या सेवांबाबत तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसेल अशा तक्रारींची दखल या डाक अदालत मध्ये घेतली जाते. तरी संबंधितांनी आपली डाक सेवेबाबतची तक्रार प्रवर अधीक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर - ४३१००१ यांच्या नावे दोन प्रतित सोमवार दि.११ पर्यंत अथवा त्यापूर्वी पोहोचेल अशा रितीने पाठवावी. नंतर प्राप्त तक्रारींची दखल घेतली जाणार नाही, असे प्रवर अधीक्षक डाकघर छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी कळविले आहे.

## संभाजीनगर जिल्हयात उड्डाण क्रियांना

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हॅण्ड लायडर्स हॉट एअर बलून इ. उड्डाण क्रियांना पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दि.२ ऑक्टोबरपर्यंत प्रतिबंध करण्यात येत आहे,असे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी आदेश निर्गमित केले आहे.

लोकशाही दिन सोमवारी (दि.६)

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जातो. ऑक्टोबर महिन्यासाठी लोकशाही दिन हा सोमवार दि.६ रोजी दुपरी १२ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे,असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगीता राठोड यांनी कळविले आहे. नागरिकांनी आपले अर्ज, निवेदने सकाळी ११ ते १२ या वेळात दाखल करावे. अर्ज विहित नमुन्यात असावा. तक्रार वैयक्तिक असावी. तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दाखल केला असल्यास त्याची पोहोच सोबत आणा-वी. तसेच न्याय प्रविष्ठ प्रकरण, राजस्व अपिल, सेवाविषयक व आस्थापनाविषयक व लोकशाही दिनात यापूर्वी दाखल केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## पैठण तालुक्यातील राहुलनगर येथे ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्साहात



**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी /प्रतिनिधि /हारुन/शेख/**समता,बंधुता,न्याय, करुणा या महान मूल्यांना आचरणात आणण्याचा तसेच वंचित,शोषित, उपेक्षित अशा घटकांना नव्या आशा,आत्मविश्वास आणि प्रगतीचा मार्ग खुला करून देणारा दिवस म्हणजे धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा देऊन सर्वांना अन्याय,विषमता, अंधश्रद्धा आणि भेदभाव यांचा त्याग करून समानतेचा मार्ग खुला करून दिला.याचे स्मरण ठेवत तालुक्यातील राहुलनगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात सर्व आंबेडकरी जनता व बौद्ध उपासक उपासिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात एकत्रित येत तथागत गौतम बुद्ध,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिशरण पंचशील ग्रहण करून एकमेकास शुभेच्छा देत ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन साजरा करण्यात आला.यावेळी कातपूर ग्राम पंचायतचे उपसरपंच विजय खडसन, ग्रा.प.सदस्य भाऊसाहेब खुटेकर,आशिषकुमार जाधव, गंगाधर म्हस्के,शिक्षक शौकत पठाण,निवृत्ती जमधडे,अनिल पवार,कैलास बर्फे रमेश खडसन,रामदास पंडित सुरेश वाहुल,अजय हिवराळे, विशाल गंगावणे,बाळू गायकवाड, भय्या निळ, राहुल गायकवाड,लहू पहिलवान,मोती गिऱ्हे आसाराम हिवराळे, विकास काळे यांच्यासह ईतर बौद्ध उपासक उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## विश्वकोश मंडळातर्फे आज (दि.५) भूविज्ञान नोंदलेखन कार्यशाळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्त महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व दयानंद महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ५ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था, नागेश्वरवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे एक दिवसीय भूविज्ञान लेखकांची नोंदलेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने करणार असून प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथगार संघटनेचे डॉ. राजशेखर बालेकर व प्रा. डॉ. पी. एस. कुलकर्णी उपस्थित असतील. सकाळी १०.३० ते ४:३० वाजेदरम्यान कार्यशाळा संपन्न होईल.

मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक संदर्भकोश असून यात मानव्य व विज्ञान विषयाच्या विविध शाखा व महत्त्वाचे विचारप्रवाह नोंदीच्या स्वरूपात समाविष्ट आहेत. मराठीचा प्रचार-प्रसार करणे, तसेच विश्वकोशीय लेखन प्रक्रियेत अभ्यासकांना सामावून घेणे या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत भूविज्ञानविषयक विद्यार्थी व अभ्यासकांना आमंत्रित करण्यात आले असून विश्वकोश नोंदीचे महत्त्व, विज्ञानविषयक कोशीय लेखन तसेच विश्वकोश नोंदलेखनाचे विविध टप्पे या विषयांवर प्रा. डॉ. एस. के. वडगबाळकर व मोहन मद्वाण्णा हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेसाठी नोंदणी केलेल्या अभ्यासकांनी उपस्थित राहाण्याचे आवाहन मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे विद्याव्यासंगी सहायक रवीन्द्र घोडराज यांनी केले आहे.

# अनुकंपा व लिपिक भरती नियुक्ती आदेश वितरणाचा राज्यस्तरीय कार्यक्रम उत्साहात

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्ती प्रक्रियेस गती आणून पात्र उमेदवारांना रोजगार उपलब्ध करून देणे हा प्रमुख उद्देश आहे. तरी या अंतर्गत अनुकंपा नियुक्ती (गट-क व गट-ड) उमेदवार व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त लिपिक-टंकलेखक संवर्गातील एकुण १२८ उमेदवारांना नियुक्ती आदेशाचे जिल्हाधिकारी कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी एकुण १२८ उमेदवारांचे शासकीय नोकरीचे स्वप्न साकार झाले, असा सुर कार्यक्रमातून उमटला.अनुकंपा व लिपीक भरती नियुक्ती आदेश वितरणाच्या राजय्स्तरीय कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री गिरीष महाजन, मंत्री छगन भुजबळ, मंत्री दादाजी भूसे यांची उपस्थिती होती. तर जिल्हास्तरीय कार्यक्रमात आमदार अर्जुन खोतकर, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दृकश्राव्य प्रणालीद्वारे हजेरी लावत नियुक्ती आदेशाचे वाटप करण्यात आलेल्या उमेदवारांचे मन:पुर्वक अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच अतिवृष्टीच्या पार्श्वभूमिवर जालना जिल्ह्यात सर्वत्र रेड अलर्ट जाहीर झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने तातडीने हालचाली करत अधिकाधिक नागरिकांना, पशुधनाला सुरक्षित स्थळी हलवले. रेड अलर्टमध्ये जिल्हा प्रशासनाने समन्वय ठेवून खुप छान काम केले. जिल्हा प्रशासनाचा प्रत्येक कामात नेहमी पुढाकार असतो. आपले काम कौतुकास्पद आहे, असेही सांगितले.




राज्यस्तरीय कार्यक्रमात ५१८७ अनुकंपा व ५१२२ लिपिक टंकलेखक भरतीतील उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. शासकीय सेवेत कार्यरत असतांना अधिकारी व कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीतून कुटुंबियांना सावरण्यासाठी कुटुंबातील एका सदस्यास अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्याचे सुधारित धोरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने पारित केले होते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात मागील महिन्यात झालेल्या मेळाव्यात उमेदवारांना शासन निर्णय व नियुक्ती प्रकियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यात अनुकंपा तत्वावर गट-'क' आणि गट-'ड' पदासाठी प्रतिक्षा यादीतील ७९ उमेदवारांची, तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडूनही ४९ उमेदवारांची नियुक्तीकरिता शिफारस करण्यात आली आहे. अशी एकुण १२८ उमेदवारांना नियुक्तीपत्रे शनिवार दि.४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता जालना जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात वाटप करण्यात आले. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे यांची समयोचित भाषणे झाली. या कार्यक्रमास नियुक्तीपत्र मिळणारे उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### तणावमुक्त जीवन या विषयावर ब्रह्माकुमारीतर्फे सोमवारी व्याख्यान

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय केंद्र जालनाच्यावतीने रोग व तणावमुक्त जीवन या विषयावर सोमवार दि. ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता जुना जालना विभागातील टाऊन हॉल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृहात राजयोगी बी. के. नारायणभाई (इंदौर) यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.बी. के. नारायणभाई यांनी आजवर देशभरात हजारो लोकांना राजयोगाच्या माध्यमातून मानसिक शांती, सकारात्मक विचार आणि रोगमुक्त जीवनाचा संदेश दिला आहे. या प्रवचनात ते मनातील नकारात्मकता, भविष्याची चिंता, कर्मयोगातून निर्माण होणारे शारीरिक व मानसिक आजार जसे डायबेटीज, ब्लडप्रेशर, डिप्रेशन, हृदयरोग, मायग्रेन, अस्थमा इत्यादीवर मात करण्याचे मार्ग सांगणार आहेत. राजयोग ध्यान व सकारात्मक चिंतनाद्वारे निरोगी आणि तणावमुक्त जीवन कसे शक्य आहे, याबाबत ते मार्गदर्शन करतील.प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य असून, नागरिकांनी या उपयुक्त व प्रेरणादायी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्यावतीने केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी शितल दीदी यांनी केले आहे.



### आष्टी येथे आज 'मी रमाई' एकपात्री नाटकाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी/ प्रतिनिधी/** आष्टी ता परतूर येथे आज दिनांक ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता येथील मोरंगेश्वर मंगल कार्यालात बुद्धभूमी चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित व प्रकाश वाघ निर्मित 'मी रमाई' एकपात्री नाटकाचे आयोजन करण्यात आले असून भारतातील हे पहिले एकपात्री नाटक असून ते माता रमाबाई आंबेडकरांच्या धाडसी जीवनावर आधारित आहे, या नाटकाच्या माध्यमातून रमाबाईंचे रडणारे नव्हे, तर परिस्थितीशी दोन हात करणारा जिवन प्रवास लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या नाटकाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.



यात या वर्षीच्या माता रमाई आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त लेखिका व रमाबाई आंबेडकर यांच्या मुख्य भूमिकेत सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे या आहेत... त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये भूमिका साकारलेल्या आहेत आम्ही जरांगे,डिलिव्हरी बॉय, प्रेमवारी, मालिका-बाळूमामाच्या नावानं चांगभलं,ज्ञानेश्वर माऊली,साता जन्माच्या गाठी,अशा अनेक मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत महाराष्ट्र भर प्रेक्षकांनी प्रचंड आत्तपर्यंत या नाटकास दाद मिळाली असुन डोळ्यासमोर जणु जिवंत माता रमाई यांचा जीवनपट पाहण्याचा अनुभव या नाटकातून होत असल्याने या नाटकास आष्टी सह परिसरातील मोठ्या संख्येने नागरिकांचा प्रतिसाद मिळणार असल्याचे नाटक आयोजन समितीचे आष्टीचे सरपंच मधुकर मोरे, गोळेगावचे सरपंच उद्धव, रोहन वाघमारे,गौतम शेळके यांच्या वतीने सांगण्यात येत आहे तरी परिसरातील सर्व रसिक प्रेक्षकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# अनुकंपा व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडील शिफारस प्राप्त उमेदवारांना ४ ऑक्टोबरला नियुक्ती पत्राचे वितरण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मुख्यमंत्री कार्यालयाकडून राबविण्यात येत असलेल्या १५० दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथे राज्यातील अनुकंपा व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडील शिफारस प्राप्त उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याचा राज्यस्तरीय कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी पडणार असून त्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

जालना जिल्ह्यातील अनुकंपा तत्त्वावरील ७९ उमेदवारांना व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे शिफारस प्राप्त ४६ अशा एकूण १२५ उमेदवारांना दिनांक ४ ऑक्टोंबर २०२५ रोजी जालना जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन याठिकाणी सकाळी ११:०० वाजता पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांच्या हस्ते नियुक्ती आदेशाचे वाटप करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार संजय जाधव, आ. सतिश चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. राजेश राठोड, आ. बबनराव लोणीकर, आ.अर्जुनराव खोतकर, आ. नारायण कुचे, आ. संतोष दानवे, आ. हिकमत उढाण, जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना श्रीमती पी. एम. मिन्नू, पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियुक्ती आदेश देण्यात येणाऱ्या विभागात जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय जालना १८,पोलीस प्रशिक्षण केंद्र १,जिल्हा कृषी कार्यालय ५,जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय जालना ४,विद्युत निरीक्षण उद्योग ऊर्जा व खनिकर्म विभाग २,मृदा व जलसंधारण विभाग ७,उपजिल्हा निबंधक सहकारी संस्था ६,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय १,जिल्हा विशेष लेखा-परीक्षक वर्ग एक सहकारी संस्था १,जिल्हा कौशल्य विकास कार्यालय १ असे एकूण ४६ उमेदवारांचा समावेश आहे तर अनुकंपा तत्वावरील गट क संवर्गामध्ये जिल्हा कोषागार कार्यालय १,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय १ विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर १,जिल्हाधिकारी कार्यालय २,जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय १ जिल्हा रेशीम कार्यालय १ कारागृह सुधारसेवा मध्य विभाग छत्रपती संभाजीनगर १,जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय १,जिल्हाधिकारी कार्यालय ८,जिल्हा परिषद जालना २४ असे एकूण ४१ उमेदवारांना आदेशाचे वाटप करण्यात येणार आहे.

अनुकंपा गट ड संवर्गामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय ६,सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य १, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय १,नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे १,जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी कार्यालय जालना ८, यांत्रिकी मंडळ नांदेड २,पोलीस प्रशिक्षण केंद्र जालना १,पोलीस अधीक्षक कार्यालय जालना १, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक तीन ५, लघुपाटबंधारे विभाग जालना ३, संचालक नगररचनाकार जालना १,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा १,जिल्हा परिषद जालना याठिकाणी ७ अशा एकूण ३८ अनुकंपा गट क उमेदवारांना नियुक्ती आदेश दिले जाणार आहेत.

# विप्र फाउंडेशनतर्फे पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या २२ कुटुंबांना किराणा किट्सचे वाटप

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** समाजासाठीची खरी सेवा म्हणजे गरजेच्यावेळी मदतीचा हात देणे, या विचाराला प्रत्यक्ष कृतीत उतरवत विप्र फाउंडेशन शाखा जालनातर्फे १ ऑक्टोबर रोजी शहरातील जनता हायस्कूल येथे विशेष सेवा उपक्रम राबविण्यात आला. शाळेत शिकणाऱ्या लाल बाग परिसरातील २२ विद्यार्थ्यांच्या घरामध्ये अलीकडेच नदीचे पाणी शिरल्यामुळे मोठे नुकसान झाले.



विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यही वाहून गेले होते. विप्र फाउंडेशनने इयत्ता दहावीतील दोन विद्यार्थ्यांना पूर्ण पुस्तकांचा संच तसेच विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना नवरात्रीच्या पवित्र पर्वाच्या निमित्ताने किराणा किटचे वाटप करून सामाजिक जबाबदारीची जाणीव जपली.

व्यासपीठावर विप्र फाउंडेशनचे अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली, संस्थापक अध्यक्ष रामनिवास गौड, भक्तमाल कथा प्रवक्ता किशोर तिवारी, सचिव पं. विजयकुमार व्यास, राजेंद्रकुमार शर्मा, चंद्रप्रकाश श्रीमाली, सूर्यप्रकाश ओझा, नारायण दायमा, दीपेश व्यास, विशाल शर्मा, सुशील गौड, दिलीप गौड, ओमप्रकाश सारस्वत, परीक्षित शर्मा, सुरेश शर्मा, भगवान दायमा, मुख्याध्यापिका श्रीमती अनिता पवार यांची उपस्थिती होती.यावेळी बोलतांना जयप्रकाश श्रीमाली म्हणाले की, समाजातील कुणाच्याही अडचणीच्या काळात मदतीसाठी तत्पर राहणे हीच खरी सेवा आहे. नवरात्रीसारख्या पावन पर्वावर विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला थोडासा दिलासा देऊन मानसिक आधार देण्याचा आमचा हा प्रयत्न आहे. सामाजिक कार्यकर्ते अशोक मिश्रा यांनी संकटकाळी एकमेकांना मदत करने हीच खरी मानवसेवा असल्याचे सांगितले.

मुख्याध्यापिका श्रीमती अनिता पवार यांनी विप्र फाऊंडेशनचे सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे असे सांगून उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाला पवन जोशी, संतोष गंडाळ, प्रभाकर सावंत, विष्णू पवार, अमोल देशमुख,राजू डोंगरे,सुधीर वाघमारे, संदीप तोडावत यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

### पिंपळी धामणगाव येथे श्री सद्गुर संत बाळु मामा चा जन्म महोत्सव केला साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यातील परतुर तालुक्यात पिंपळी धामणगाव येथे श्री.सद्गुरू संत बाळु मामा जन्म मोहत्सव २०२५ जोरात साजरा करतानां ऋषिकेश मोगरे महाराज बालु कुकडे पांडुरंग काळे रामेश्वर काळे लखन काळे सिद्धेश्वर काळे ज्ञानेश्वर गिरी गंगाधर कुकडे प्रभु शिंदे वामन कोरडे संतोष कोरडे राम कुरधने विष्णू कुरधने सुदाम मोगरे रतन मोगरे जगदीश काळे कुलदीप बन दादा काळे नामदेव कुकडे गणेश कोठाळे राजे भाऊ मुळे तुकाराम मोगरे खंडु काळे यशवंत काळे एकनाथ काळे मधुकर खरात प्रल्हाद वाहुळे गोरख वाहुळे बाळासाहेब वाहुळे सर्वेश वाहुळे ह्यांनी आरती घेतली.



तर सर्वेश सिमा प्रल्हाद वाहुळे या बालकांनी मंदीराच्या आवारात खूप घान कचरा गोळा होत होता तो होऊ नये व परिसरात कायम स्वच्छता राहावी.म्हणून ज्यावेळी प्रत्येक अमावस्येला भंडारा प्रसादाची पंगत होते तेव्हा उष्टी पत्रावळी हाताने उचलून टाकावी लागायची ती उष्टी पत्रावळी उचलण्यासाठी टब व टोपली चं दान श्री.खंडोबा मंदिराला सर्वेश सिमा प्रल्हाद वाहुळे यांनी ऋषिकेश मोगरे महाराज यांच्या कडे दान सुपुर्त केले.गावातील सर्वंच तमाम महिला व पुरुष खूप मोठ्या भक्तिभावाने तसं श्री.सद्गुरू संत बाळु मामा यांच्या जन्म महोत्सवाला उपस्थित राहीले होते.

# संत निरंकारी मिशनला मानवसेवेतील अद्वितीय योगदानासाठी विशेष सन्मान

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** गांधी जयंतीच्या निमित्ताने २ ऑक्टोबर, २०२५ रोजी श्रीनगर येथील इंटरनॅशनल हॉटेल मध्ये गांधी ग्लोबल फॅमिलीच्या वतीने एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाची अध्यक्षता पद्मश्री डॉ. एस. पी. वर्मा यांनी केली. या कार्यक्रमाचा उद्देश महात्मा गांधींना श्रद्धांजली अर्पण करणे तसेच त्यांच्या सिद्धांत व विचारांना पुनः स्मरण करणे हा होता. या गौरवशाली कार्यक्रमात अनेक प्रतिष्ठित संस्थांनी देखील सहभाग घेतला, ज्यामध्ये संत निरंकारी मिशनचे प्रतिनिधित्व करत संत निरंकारी मंडळाचे सचिव श्री. जोगिंदर सुखीजाजी यांची उपस्थिती सन्माननीय होती. श्री. सुखीजाजी यांनी महात्मा गांधींना श्रद्धांजली अर्पण करत आपल्या संबोधनात संत निरंकारी मिशनचा मूलभूत सिद्धांत मानवाला मानव प्रिय असावा, एकमेकांचा आधार बनावा अधोरेखित केला. निरंकारी मिशन कशा प्रकारे विश्वबंधुत्व, एकत्व आणि बंधुभावाच्या भावनेचा प्रभावी प्रसार करीत आहे हे त्यांनी सांगितले. या प्रसंगी त्यांनी सर्व मान्यवर व्यक्तींना व संस्थांना आगामी निरंकारी संत समागम जो ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे होणार आहे त्यासाठी आमंत्रित केले. ते पुढे म्हणाले, की संत समागम हा असा आध्यात्मिक मंच आहे, जिथे सर्व धर्म, जात व समाजातील लोक एकत्र येऊन प्रेम, एकता आणि बंधुभावाचे अनुपम उदाहरण प्रत्यक्ष साकार करतात. हे आयोजन मानवतेच्या खर्या स्वरूपाला प्रकाशित करते. मानवतेच्या निःस्वार्थ सेवेच्या मार्गावर अग्रेसर संत निरंकारी मिशन, सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली निरंतर समाजकल्याणाचे कार्य समर्पण भावनेने करत आहे. मिशनद्वारे केली जाणारी ही सेवा संपूर्ण विश्व एक कुटुंब या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्याचा



सशक्त व यशस्वी प्रयास आहे. मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनद्वारे वेळोवेळी अनेक सामाजिक उपक्रम तसेच शिबिरे आयोजित केली जातात. ज्यात पर्यावरण संरक्षण, आरोग्य सेवा, रक्तदान, स्वच्छता अभियान तसेच आपत्ती निवारण अशा क्षेत्रांत संपूर्ण भारतभर मिशन निरंतर कार्य करत आहे जे उल्लेखनीय व अनुकरणीय आहे. जम्मू-कश्मीरमध्ये आलेल्या नैसर्गिक आपत्तीत जसे की पूर, ढगफुटी आणि ऑपरेशन सिंदूरच्या काळात मिशनने अत्यंत संवेदनशीलता व तत्परतेने मदतकार्य केले. प्रभावित कुटुंबांपर्यंत अन्नधान्य, औषधे व आवश्यक मदत पोहोचवून मिशनने पुन्हा एकदा सिद्ध केले, की ते मानव सेवेच्या प्रत्येक कार्यासाठी सदैव तत्पर व सक्रिय आहेत. या सेवांची भरपूर प्रशंसा वेळोवेळी समाजातील विविध घटकांसह शासनानेही केली.याच क्रमात, शेर-ए-कश्मीर आंतरराष्ट्रीय संमेलन केंद्र, श्रीनगर येथे आयोजित भव्य समारंभात जम्मू व कश्मीरचे माननीय उपराज्यपाल मनोज सिन्हाजी यांनी संत निरंकारी मंडळाचे सचिव श्री. जोगिंदर सुखीजाजी यांना मिशनच्या या निःस्वार्थ सेवेबद्दल विशेष सन्मान प्रदान केला. सन्मान स्वीकारताना श्री. जोगिंदर सुखीजाजी म्हणाले, की संत निरंकारी मिशन सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या प्रेरणेने सदैव समाजकल्याण आणि मानव सेवेप्रति कटिबद्ध आहे.

आमचे प्रत्येक कार्य सेवा, समर्पण आणि एकत्व या सिद्धांतांवर आधारित आहे. नैसर्गिक आपत्तीमधील मदतकार्य असो वा रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमांतील सहभाग असो, या सगळ्यात मिशन नेहमीच अग्रेसर राहिले आहे. आमचा उद्देश प्रत्येक मानवापर्यंत प्रेम, शांती आणि ऐकतेचा संदेश पोहोचवणे हा आहे.

निःसंशयपणे, गांधी जयंतीच्या या स्मरणीय प्रसंगी संत निरंकारी मिशनचा सहभाग व मिशनला मिळालेला सन्मान हे दोन्हीसुद्धा समाजाप्रतीच्या मिशनच्या समर्पण, निःस्वार्थ सेवा आणि विश्वबंधुत्वाच्या भावनेचे उज्ज्वल प्रतीक आहे. हे मिशन आजही त्याच आदर्श मार्गावर वाटचाल करत आहे, जिथे मानवता सर्वोतोपरी आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813